## ② कायदेमंडळ :-

I) प्रस्तावना :-

कायदेमंडळ हे सरकारचे एक महत्वाचे अंग आहे. कायदा तयार करण्यासाठी कायदेमंडळ अस्तित्वात आलेले आहे. भारतामध्ये केंद्रिय कायदेमंडळाला संसद असे म्हणतात. संसदेला इंग्रजीमध्ये Parlement असे म्हणतात. Parlement हा शब्द Parley या शब्दापासून तयार झालेला आहे. पारले या शब्दाचा अर्थ संभाषण करणे, चर्चा करणे असा होतो. त्यावरून संभाषण करण्याच्या जागेला Parlement किंवा संसद असे म्हणतात. भारतामध्ये हिच्छी कायदेमंडळाचा स्विकार केलेला आहे. कलम 79 नुसार भारतिय संघराज्यासाठी एक संसद असेल व त्यात राष्ट्रपती, राज्यसभा व लोकसभेचा समावेश होईल असा उल्लेख करण्यात आलेला आहे. राष्ट्रपतीला संसदेचा एक घटक समजले जात असले तरी ते संसदेचे सदस्य राहत नाहीत. लोकसभा हे प्रथम व कनिष्ठ सभागृह असून जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे. तर राज्यसभा परंतू हे वरीष्ठ व द्वितीय सभागृह असून घटकराज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे.

II राज्यसभेची रचना :-

1) सदस्यसंख्या :-

राज्यसभेची सदस्यसंख्या 250 आहे. ही सदस्यसंख्या घटकराज्यांची लोकसंख्या निश्चित केले जाते. महाराष्ट्रातून राज्यसभेवर 19 सदस्य पाठवले जातात.

2) निवड :-

राज्यसभेतील 250 पैकी 238 सदस्यांची निवड विधानसभेमधून केली जाते म्हणजेच जनतेद्वारे अप्रत्यक्षपणे एकलसंक्रमणीय गुप्त मतदान पद्धतीने निवडले जातात. तर 12 सदस्य राष्ट्रपतीद्वारे विज्ञान, कला, साहित्य, सेवा, इ. क्षेत्रामधून नियुक्त केले जाते.

3) पात्रता :-

1) तो भारताचा नागरिक असावा.
2) वय 30 वर्ष पूर्ण झालेले असावे.
3) तो घटकराज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे त्या घटकराज्याच्या मतदान यादीत त्याचे नाव असावे.
4) तो ~~तत्कालीन~~ सरकारी नोकरदार नसावा.
5) संसदेने वेळोवेळी केलेल्या अटी पूर्ण केलेल्या असाव्या.

4) कार्यकाळ :-

राज्यसभा हे स्थायी / कायमस्वरूपाचे सभागृह आहे. राज्यसभेचे विसर्जन केले जात नाही. परंतु सदस्यांचा कार्यकाल मात्र 6 वर्षाचा असतो. दर दोन वर्षांनी 1/3 सदस्य निवृत्त होतात व तेवढेच नव्याने सदस्य निवडले जातात.

5) अधिवेशन :

संसदेच्या दोन्ही सभागृहाचे वर्षातून किमान दोन अधिवेशने बोलावले पाहिजे. पण दोन अधिवेशनामधील कमाल 6 महिन्यापेक्षा जास्त असू नये. परंतू भारतात प्रत्यक्षात संसदेचे तीन अधिवेशने बोलावले जातात.

6) गणसंख्या :-

सभागृहाचे कामकाज सुरू करण्यासाठी

Scanned with CamScanner

निश्चित ठरविण्यात आलेल्या संख्येला गणसंख्या किंवा कोरम असे म्हणतात. राज्यसभा व लोकसभेच्या बैठकीचे कामकाज चालू करण्यासाठी त्या त्या सभागृहाच्या सदस्य संख्येच्या 1/10 सदस्य कोरम म्हणून निश्चित करण्यात आले आहे.

7) वेतन व भत्ते :-

संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांना समान वेतन व भत्ते दिली जातात. त्यांचे वेतन ठरवण्याचा अधिकार संसदेलाच आहे. मासिक 50,000 रु मासिक वेतन व इतर भत्ते दिले जातात. याशिवाय निशुल्क निवास, प्रवास व इतर सुखसोई प्राप्त होतात.

8) शपथविधी :-

संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांना राष्ट्रपतीद्वारे शपथ दिली जाते

9) खासदारखंड :-

संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांना आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी 2 कोटी रु खासदार खंड दरवर्षी दिले जातात

10) विशेष पदाधिकारी :-

राज्यसभेमध्ये सभापती व उपसभापती असे दोन पदाधिकारी असतात. कलम 89 नुसार भारताच्या उपराष्ट्रपती राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो परंतू तो राज्यसभेचा सदस्य नसतो. त्यामुळे त्याला राज्यसभेमध्ये मतदान करता येत नाही. समान मते ए त्यास निर्णायक मत देवू शकतो. त्याचा कार्यकाल

५ वर्षांचा असतो. राज्यसभेच्या अध्यक्षास म्हणजेच उपराष्ट्रपतीस महाभियोगाद्वारे पदच्युत केले जाते.

राज्यसभेच्या अध्यक्षाच्या अनुपस्थितीत सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी राज्यसभेतील सभासद आपल्यामधून एक उपसभापती म्हणून निवड करतात. उपसभापतीचा कार्यकाल ६ वर्षांचा असतो.

ii) राज्यसभेच्या सभापतीचे अधिकार व कार्य

①

★ → <u>राज्यसभेचे</u> <u>अधिकार</u> <u>आणी कार्ये</u> :

i) <u>कायदेविषयक</u> <u>अधिकार</u> :-

धनविधेयक सोडून इतर कोणतेही विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात सर्वप्रथम मांडले

Scanned with CamScanner

जाते. अर्थविधेयक मात्र सर्वप्रथम लोकसभेमध्येच मांडले जाते. विधेयकास राज्यसभा व लोकसभेमध्ये चर्चा मतदान झाल्यानंतर दोन्ही सभागृहांनी मान्यता दिल्यानंतर ते विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाते. राष्ट्रपतींच्या संमतीनंतर विधेयकाचे कायद्यामध्ये रूपांतर होते.

एखाद्या विधेयकाबाबत लोकसभा व राज्यसभेमध्ये मतभेद निर्माण झाल्यास संयुक्त बैठक बोलावली जाते. संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान लोकसभेच्या सभापतींकडे असते. परंतू घटनादुरुस्तीच्या विधेयकाबाबत संयुक्त बैठक बोलावली जात नाही.

राज्यसभा व लोकसभेला केंद्रसूची व राज्यसूचीतील व शेषाधिकारावर कायदा करण्याचा तसेच राष्ट्रपतींनी काढलेल्या वटहुकूमांना मान्यता देण्याचा अधिकार आहे.

२) शासनविषयक अधिकार :-

राज्यसभा व लोकसभेला कायदेविषयक अधिकाराबरोबर शासनविषयक अधिकार ही देण्यात आले आहेत त्यामध्ये

i) कार्यकारी मंडळावर म्हणजेच सरकारवर / मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवणे

ii) मंत्र्यांना प्रश्नउपप्रश्न विचारून लेखी किंवा तोंडी उत्तर मिळविणे

iii) मंत्रिमंडळाच्या चुकीच्या निर्णयावर टिका करणे

iv) सरकारविरुद्ध अविश्वासाचा प्रस्ताव, कपात प्रस्ताव, कामरोको प्रस्ताव मांडणे

३. अनेक मार्गांनी कायदेमंडळाद्वारे सरकारवर नियंत्रण ठेवले जाते

३) अर्थविषयक अधिकार :-

आर्थिक बाबतीत राज्यसभेपेक्षा लोकसभेला जास्त अधिकार आहेत. अर्थविधेयक सर्वप्रथम लोकसभेमध्येच मांडले जाते. राज्यसभेला अर्थविधेयक सर्वप्रथम मांडण्याचा अधिकार नाही. लोकसभेने मंजूर केलेल्या अर्थविधेयकावर १४ दिवसा विचार करून राज्यसभेला आपला निर्णय कळवावा लागतो. १४ दिवसाच्या आत राज्यसभेनी आपला होकार किंवा नकार दिला नसल्यास राज्यसभेचा होकार आहे असे गृहित धरून ते विधेयक पास केले जाते. अर्थविधेयकाबाबत मतभेद निर्माण झाल्यास संयुक्त बैठक बोलावली जात नाही. अर्थविधेयकावर राज्यसभेला सुचना करण्याचा अधिकार आहे पण राज्यसभेनी केलेल्या सुचना मान्यच केल्या पाहिजे असे लोकसभेवर बंधन नाही.

४) संविधानसंशोधनाचा अधिकार :-

(घटनादुरुस्तीचा अधिकार) कलम ३६८ नुसार संविधानामध्ये बदल करण्याचा अधिकार दोन्ही सभागृहांना समान आहे. संविधान संशोधनासाठी प्रत्येक सभागृहाच्या एकूण सदस्यांच्या बहुमताने व उपस्थित सदस्यांच्या 2/3 बहुमताची आवश्यकता असते. संविधान संशोधनाबाबत राज्यसभा व लोकसभेमध्ये मतभेद झाल्यास संयुक्त बैठक बोलावली जात नाही.

थोडक्यात दोन्ही सभागृहांच्या 2/3 बहुमताने व राष्ट्रपतीच्या संमतीने संविधानामध्ये बदल करण्यात येतो.

५) निवडणूकी संबंधीचा अधिकार :-

लोकसभा व राज्यसभेच्या निर्वाचित सदस्याला राष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार आहे. उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीत

दोन्ही सभागृहाचे सर्व सदस्य मतदान करतात. तसेच लोकसभेच्या सभापती, उपसभापती व राज्यसभेच्या उपसभापती निवडण्याचा अधिकारही आहे.

६) महाभियोगासंबंधीचा अधिकार

भारताच्या राष्ट्रपती उपराष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधिश यांच्यावर महाभियोगाचा खटला चालवून त्यांना पदच्यूत करण्याचा अधिकार संसदेच्या दोन्ही सभागृहाला आहे. त्यासाठी लोकसभा व राज्यसभेत २/३ बहूमताची आवश्यकता असते.

* राज्यसभेचे विशेषाधिकार :

ज्याप्रमाणे लोकसभेला अर्थविधेयक सर्वप्रथम आपल्या सभागृहामध्ये मांडण्याचा विशेष अधिकार आहे. त्याप्रमाणे राज्यसभेलाही काही विशेषाधिकार ~~राज्यसभेला~~ आहेत.

i) उपराष्ट्रपतीवर महाभियोगाचा / पदच्यूतीचा प्रस्ताव सर्वप्रथम राज्यसभेमध्येच मांडला जातो. लोकसभेमध्ये मांडता येत नाही.

ii) कलम २४९ नुसार राज्यसूचीतील एखादा विषय राष्ट्रहिताच्या दृष्टिने महत्वाचा असल्यास त्यावर कायदा करण्याचा (विधेयक मांडण्याचा) सर्वप्रथम अधिकार राज्यसभेलाच आहे,

iii) कलम ३१२ नुसार नविन अखिल भारतीय सेवेची स्थापना करण्याचा अधिकार सर्वप्रथम राज्यसभेस आहे

१. विविध प्रकारचे अधिकार व कार्ये राज्यसभेस पार पाडावी लागतात.

Scanned with CamScanner

* लोकसभा

1) प्रस्तावना

2) लोकसभेची रचना

① सदस्यसंख्या :

लोकसभेची सदस्यसंख्या जास्तीत जास्त 552 असते त्यात 530 घटकराज्याचे व 20 केंद्रशासित प्रदेशाचे व 2 अँग्लोइंडियन जमातीचे प्रतिनीधी असतील. परंतू सध्या वर्तमान काळात लोकसभेची सदस्य संख्या 545 आहे. महाराष्ट्रातून 48 सदस्य लोकसभेसाठी निवडले जातात.

② प्रतिनिधीत्व :-

लोकसभा हे जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे. लोकसभेची सदस्यसंख्या लोकसंख्येच्या प्रमाणानूसार निश्चित केली जाते. साधारणत: 10 लाख लोकसंख्येच्या पाठीमागे 1 प्रतिनिधी असे त्याचे प्रमाण ठरविण्यात आले आहे.

③ निवडणूक :-

लोकसभेच्या सदस्याची निवडणूक जनते तर्फे प्रत्यक्षपणे गुप्त मतदान पद्धतीने प्रौढ मताधिकाराच्या आधारावर होते.

④ पात्रता :-

i) तो भारताचा नागरिक असावा

ii) त्याचे वय 25 वर्ष पूर्ण झालेले असावे

iii) तो सरकारी नोकरदार नसावा

iv) देशातील कोणत्याही संसदीय मतदार संघाच्या यादीमध्ये त्याचे नाव असावे

v) संसदेने वेळोवेळी विहीत केलेल्या अटी त्याने पूर्ण केल्या असाव्यात

vi) वेडा दिवाळखोर, परकीय नागरिक, दहशतवादी नसावा.

⑤ कार्यकाल :-

लोकसभेचा कार्यकाल व सदस्यांच्या कार्यकाल ५ वर्षांचा असतो. कार्यकाल पूर्ण होण्या अगोदर प्रंतप्रधानाच्या विनंतीवरून लोकसभेचे विसर्जन करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

⑥ राजीनामा व पदच्युती :-

आपला कार्यकाल पूर्ण होण्याअगोदर राज्यसभा व लोकसभेच्या सदस्याला स्वइच्छेनुसार सभापतीकडे राजीनामा देता येतो. तसेच सभागृहाच्या परवानगीशिवाय सतत ६० दिवस अधिवेशन व बैठकीस अनुपस्थित राहिल्यास त्याचे सदस्यत्व आपोआप रद्द होते

⑦ गणसंख्या :

⑧ वेतन / भत्ते :

⑨ खाजदार खंड :-

⑩ शपथविधी :

⑪ अधिवेशन

⑫ पदाधिकारी :

लोकसभेमध्ये अध्यक्ष व उपाध्यक्ष

असे दोन पदाधिकारी असतात. संसदीय शासनव्यवस्थे मध्ये लोकसभेच्या सभापतीस महत्वाचे स्थान आहे भारताने हे पद इंग्लंडकडून स्विकारले आहे. सभापतीचे पद प्रतिष्ठेचे व निपक्षपातीपणाचे आहे. डिझरायल यांनी असे मत व्यक्त केले की, स्पीकरच्या किंवा सभापतीच्या वस्त्राचा आवाज सभागृहातील गडबड किंवा गोंधळ दूर करतो. यावरून सभापतीच्या कार्याचे स्वरूप लक्षात येते. स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम गणेश वासुदेव मावळंकर यांनी सभापतीचे पद भूषविले आहे तर, एम. ए आयंगार यांनी उपसभापतीचे पद भूषविले आहे. सध्या लोकसभेच्या सभापती म्हणून सुमित्रा महाजन या कार्यरत आहेत.

३) संविधानात्मक तरतूद :-

① भारतीय संविधानाच्या ५ व्या भागातील कलम ९३ ते ९७ मध्ये लोकसभेच्या सभापती व उपसभापतीची तरतूद करण्यात आली आहे

② निवड :

लोकसभेच्या सभापती व उपसभापतीची निवड लोकसभेचे सदस्य आपापल्यामधूनच करतात. निवडीनंतर त्यांनी निपक्षपातीपणाने कार्य करावे अशी अपेक्षा असते.

③ कार्यकाल :-

लोकसभेच्या सभापतीचा कार्यकाल त्याच्या निवडीच्या दिवसापासून ते लोकसभेच्या विसर्जनानंतर नि. नवनिर्वाचित लोकसभेच्या पहिल्या बैठकीपर्यंत असतो.

Scanned with CamScanner

④ **राजीनामा व पदच्युती** :-

कार्यकाल पूर्ण होण्या अगोदर सभापती उपसभापतीकडे व उपसभापती सभापतीकडे राजीनामा देवू शकतो. तसेच सभापती 14 दिवस अगोदर लेखी सूचना देऊन सभागृहामध्ये प्रस्ताव मांडून बहुमताच्या आधारावर त्यास पदच्यूत करता येते.

⑤ **वेतन व भत्ते** :-

सभापती व उपसभापतींचे वेतन भत्ते निश्चित करण्याचा अधिकार संसदेला आहे. मासिक वेतन, निशुल्क निवास, प्रवास व इतर सुखसोई दिल्या जातात.

⑥ **सभापतींचे अधिकार व कार्ये** :-

1) लोकसभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान स्विकारणे
2) सभागृहामध्ये शांतता सुव्यवस्था प्रस्थापीत करणे
3) लोकसभेची बैठक समाप्त करणे
4) गणसंख्या किंवा कोरम पूर्ण झाला आहे किंवा नाही ते पाहणे
5) सदस्याला बोलण्याची परवानगी देणे
6) गोंधळ घालणाऱ्या सदस्याचे सदस्यत्व स्थगित करणे
7) सभागृहामध्ये गोंधळ निर्माण झाल्यास बैठक स्थगित किंवा तहकुब करणे
8) संसद व राष्ट्रपती यांच्यातील एक दुवा म्हणून कार्य करणे.
9) एखादे विधेयक धन विधेयक आहे किंवा नाही हे ठरविणे
10) विधेयकावर चर्चा घडवून आणने
11) विधेयक मतास टाकणे

Scanned with CamScanner

12) समान मते पडल्यास निर्णायक मत देणे
13) संमत झालेल्या विधेयकावर स्वाक्षरी करणे
14) स्वाक्षरी नंतर ते विधेयक राज्यसभेकडे किंवा राष्ट्रपतीकडे पाठवणे
15) कामकाजाचे नियमन किंवा संचलन करणे
16) सदस्यांच्या अधिकाराचे संरक्षण करणे

इ. विविध प्रकारचे अधिकार व कार्य सभापतीस पार पाडावे लागतात.

* लोकसभेचे अधिकार व कार्ये —

1) कायदेविषय अधिकार
2) अर्थविषयक अधिकार
3) शासनविषयक अधिकार
4) निवडणूक विषयक अधिकार
5) संविधान संशोधनाचा अधिकार
6) महाभियोगाचा अधिकार
7) इतर अधिकार :-

1) जनतेच्या समस्या दूर करणे
2) देशामध्ये शांतता सुव्यवस्था प्रस्थापीत करणे
3) आणीबाणीच्या घोषणेला मान्यता देणे
4) गुन्हेगाराची शिक्षा कमी करण्याचा किंवा अधिकार राष्ट्रपतीला असला तरी त्यास संसदेची स्विकृती घ्यावी लागते.

## कायदा निर्मितीची प्रकिया :-

I) प्रस्तावना :-

कायदा म्हणजे नियम होय किंवा संसदेने मान्य केलेला आणी राष्ट्रपतीची स्वाक्षरी आलेला नियम म्हणजे कायदा होय. कायदा तयार करणे हे कायदे मंडळाचे प्रमुख कार्य आहे. संविधानाच्या कलम 107 ते 117 मध्ये कायदा निर्मितीच्या प्रक्रियेचा विचार करण्यात आलेला आहे. कायदा तयार करण्याच्या कच्च्या आराखड्याला विधेयक असे म्हणतात. विधेयकाचे सामान्य विधेयक व अर्थविधेयक असे दोन प्रकार पडतात.

अ) अर्थविधेयक :-

अर्थविधेयक हे सर्वप्रथम लोकसभेत मांडले जाते. एखादे विधेयक अर्थविधेयक आहे की नाहि हे ठरवण्याचा अधिकार लोकसभेच्या सभापतीला असतो. अर्थविधेयक कशाला म्हणावे ते संविधानाच्या कलम 110 मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे त्यानुसार कर, कर्ज संचितनिधी इ. संबंधीच्या विधेयकांना किंवा जमा खर्च संबंधीच्या विधेयकाला धन विधेयक असे म्हणतात. धन विधेयक लोकसभेमध्ये मंजूर झाल्यास ते राज्यसभेकडे पाठवले जाते. राज्यसभेला 14 दिवसाच्या आत त्यावर आपला नकार किंवा होकार दयावा लागतो. धनविधेयकाबाबत लोकसभा आणी राज्यसभेमध्ये मतभेद निर्माण झाल्यास संयुक्त बैठक बोलावली जात नाही. धनविधेयकासाठी राष्ट्रपतीची समंती आवश्यक असते.

राष्ट्रपतीच्या समंतीनतंरच त्याचे कायदयामध्ये रुपांतर होते.

ब] सामान्य विधेय :-

सामान्य विधेयकाचे १) सरकारी विधेयक व २) गैरसरकारी किंवा खाजगी विधेयक असे दोन प्रकार पडतात. विधेयक जर संस्थाकडून मांडण्यात आले असेल तर त्यास सरकारी विधेयक असे म्हणतात. आणी विधेयक संसदेच्या सदस्याकडून मांडले असेल तर त्यास गैरसरकारी किंवा खाजगी विधेयक असे म्हणतात. अर्थविधेयक सोडून इतर सर्व विधेयकाचा समावेश सामान्य विधेयकामध्ये होतो. काहीनी संविधान संशोधनाच्या विधेयकाला विधेयकाचा वेगळा प्रकार म्हटले आहे. संविधान संशोधकाच्या विधेयकाचा समावेश सामान्य विधेयकातच केला जातो.

सामान्य विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहामध्ये मांडता येते. प्रत्येक सभागृहात तीन वाचन किंवा पाच अवस्था होतात.

1] प्रथम वाचन :-

प्रथम वाचनाच्या वेळी विधेयक संबधीत सभागृहामध्ये प्रस्तूत केले जाते व विधेयक वाचून त्यातील प्रमूख गोष्टीची माहिती सभागृहामध्ये होते. विधेयक प्रस्तूत करण्यापूर्वी सात दिवस अगोदर सभागृहाला सुचना द्यावी लागते. पहिल्या वाचनाच्या वेळी वाद-विवाद, चर्चा होत नाही.

2] द्वितीय वाचन :-

द्वितीय वाचनाच्या वेळी त्याविधेयकाच्या प्रती सभागृहाच्या सर्व सदस्याला दिल्या जातात. द्वितीय वाचनाच्या वेळी

१) विधेयकावर तावडतोब चर्चा करणे

Scanned with CamScanner

२) विधेयक प्रवर समितीकडे पाठवणे
३) विधेयकावर जनमत घेणे
४) विधेयकाला राज्यसभेच्या मान्यतेनंतर संयुक्त प्रवर समितीकडे पाठविणे
यापैकी एक निर्णय घेतला जातो. शक्यतो हे विधेयक प्रवर समितीकडे पाठवले जाते

३] समिती अवस्था :-
समिती अवस्थेमध्ये विधेयकावर सविस्तर कलमवार चर्चा होते. विधेयकाची सर्व माहिती गोळा केली जाते. विधेयकामध्ये दुरुस्ती केली जाते व आपला अहवाल तयार करून समिती च्या अध्यक्षाच्या स्वाक्षरीने संबंधीत सभागृहाकडे पाठवला जातो

४] समिती अहवाल / प्रतिवेदन अवस्था :-
समितीकडून आलेल्या अहवालावर सभागृहात सविस्तरपणे कलमवार चर्चा होते वादविवाद होतो. विधेयकाची ही अवस्था सर्वात महत्वाची असते. चर्चेनंतर काही कलमावर आवश्यकतेनुसार मतदान घेतले जाते विधेयकाच्या प्रस्तावनेवर व शिर्षकावर ही चर्चा होते

५] तिसरे वाचन :-
विधेयकाची अंतिम अवस्था म्हणजे तृतीय वाचन होय. या वेळी त्याचे संपूर्ण वाचन केले जाते. काही दोष असतील तर दूर केले

जातात. शब्दामध्ये फेरबदल केला जातो. औपचारिक दुरुस्त्या सुचविल्या जातात व शेवटी त्यावर मतदान घेतले जाते. बहुमताने ते विधेयक मान्य आल्यास सभागृहाच्या सभापती त्यावर स्वाक्षरी करून दुसऱ्या सभागृहाकडे पाठवतो.

ii) दुसऱ्या सभागृहाची संमती :-

दुसऱ्या सभागृहाकडे संबंधीत विधेयक आल्यास दुसऱ्या सभागृहामध्येही त्या विधेयकाचे तीन वाचन किंवा पाच अवस्था होतात दुसऱ्या सभागृहाने त्या विधेयकास मान्यता दिल्यास ते विधेयक राष्ट्रपतीच्या संमतीसाठी जाते.

iii) राष्ट्रपतीची संमती :-

विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी राष्ट्रपतीची संमती आवश्यक असते. दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेले विधेयक जेव्हा राष्ट्रपतींच्या संमतीसाठी येते तेव्हा त्यास राष्ट्रपती शक्यतो संमती देतो परंतु राष्ट्रपतीला त्या विधेयकाला एक वेळा नकार देण्याचा अधिकार आहे. दुसऱ्यांदा ते विधेयक आहे त्या स्वरूपात किंवा बदल करून आल्यास राष्ट्रपतीला मान्यता द्यावीच लागते.

अशा प्रकारे भारतामध्ये कायदा निर्मितीची प्रक्रिया पार पाडली जाते.

Scanned with CamScanner